प्रेसनोट

एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगाव
दिनांक २१/५/२०२५

प्रति,
संपादक
---------------------------

## दुकानाचे शटर वाकवुन बॅटरी चोरी करणारे आरोपी मुद्देमालासह २४ तासात एमआयडीसी पो स्टे करवी जेरबंद

अब्दुल्ला किताबुल्ला चौधरी वय ४७ वर्षे व्यवसाय बॅटरी दुकान रा सुप्रिम कॉलनी जळगाव यांचे जळगाव शहरात अजिंठा चौफुली येथे मानस हॉटेल शेजारी चौधरी बॅटरी ट्रेडींग नावाचे बॅटरीचे दुकान असुन त्यांचा जुन्या बॅटरी खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. दिनांक १७/५/२०२५ रोजी २०.०० वाजता ते दिनांक १८/५/२०२५ रोजी ०८.०० वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे मालकीचे चौधरी बॅटरी ट्रेडींग नावाचे दुकानाचे लोखंडी शटर वाकवुन दुकानातील ४१०००/- रुपये किंमतीच्या वेगवेगळ्या कंपनीच्या जुन्या ४१ बॅटऱ्या चोरुन नेलेल्या आहेत त्याबाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलीस स्टेशनला ३६२/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३४(१), ३०५(अ) प्रमाणे दिनांक १९/५/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

जळगाव शहरात व जिल्ह्यात होत असलेले मालमत्तेचे गुन्ह्यांना आळा बसावा व मालमत्तेचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत मा पोलीस अधीक्षक डॉ महेश्वर रेड्डी, मा अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, व मा उपविभागीय पोलीस अधिकारी जळगाव उपविभागी संदीप गावीत यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचना नुसार व मार्गदर्शनानुसार एमआयडीसी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पो नि संदीप पाटील यांनी सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याबाबत डी बी पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करुन सुचना दिल्या असता त्यांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवुन, घटनास्थळाचे व आजुबाजुचे सि सि टी व्ही फुटेजची बारकाईने पाहाणी करुन सदरचा गुन्हा करण्यासाठी आरोपीतांनी पांढरे रंगाचे बोलेरो पिकअप वाहनाचा वापर केलेला असुन त्याबाबत गोपनिय माहीती तसेच तांत्रीक माहीतीचे विश्लेषन करुन गुन्ह्याचे तपासात तेल्हारा जि अकोला येथे जावुन गुन्ह्यातील दोन आरोपीतांना जेरबंद करुन गुन्ह्यात वापरलेले वाहन व चोरीस गेलेल्या बॅटरी २४ तासाचे आत हस्तगत करुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदर गुन्ह्यात आरोपी १)अजमदउल्ला अमानतउल्ला खान वय २४ वर्षे रा पिंपळगाव राजा ता.खामगाव जि बुलढाणा २) सैय्यद दानिश सैय्यद ईसमाईल वय २५ वर्षे रा घोडेगाव ता तेल्हारा जि अकोला यांना दिनांक २०/५/२०२५ रोजी १३-४१ वाजता अटक करण्यात आलेली आहे. सदर आरोपीतांकडुन गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या ३१०००/- रुपये किंमतीच्या वेगवेगळ्या कंपन्याच्या बॅटऱ्या हस्तगत केलेल्या असुन गुन्ह्यात वापरलेले ६ लाख रुपये किंमतीची एम एच ३० बी डी ६८७३ क्रमांक असलेली महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन जप्त करण्यात आलेले असुन गुन्ह्याचे तपासात एकुण ६३१०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरचा गुन्हा एमआयडीसी पोलीस स्टेशनचे डि बी पथकाचे पो उ नि राहुल तायडे , चंद्रकांत धनके, स पो उ नि दत्तात्रय बडगुजर, पो ना प्रदीप चौधरी, पो कॉ सिध्देश्वर डापकर, रतन गिते, योगेश बारी यांनी केलेली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहायक फौजदार दत्तात्रय बडगुजर हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय जळगाव


एम.आय.डी.सी.
पोलीस स्टेशन जळगाव
फोन नं. 0257 - 2210500 / 2210163
YOU ARE UNDER
CCTV
SUREILLANCE
LUMINOUS